# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.३८९ दिनांक १७/०४/२०२०**

**पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या वाहनचालकांची चौकशी नकरता पेट्रोल विक्री करुन मनाई आदेशाचा भंगकरणा-या पेट्रोलपंप मालक यांचेवर वालीव व विरार पोलीस ठाणेत गुन्हा दाखल.**

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोकण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनंक १३/०३/२०२० रोजी पासुन लागु करुन खंड २, ३, व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. पालघर जिल्हयामध्ये कोवीड-१९ मुळे बाधीत झालेल्या रुग्णांची संख्या वाढत असल्याने जिल्हयामध्ये पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी लागत असलेल्या रांगा व वाहनांमध्ये पेट्रोल भरुन अनावश्यक फिरणा-या इसमांमुळे कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव वाढु नये व लॉकडाऊनची अमंलबजावणी चांगल्या प्रकारे व्हावी याकरिता मा.जिल्हाधिकारी पालघर यांचे कार्यालयीन जा.क्र.जि. आ.व्य.पालघर/को.वि.पेट्रोल/डिझेल वितरण आदेश/कावि-४७४/२० दिनांक ०८/०४/२०२० अन्वये सर्व पेट्रोलपंप धारक यांनी अत्यावश्यक सेवेसाठी दिलेले वाहने सोडुन इतर सर्वखाजगी वाहनांना पेट्रोल-डिझेल विक्री करणेस मनाई करण्यात येत आहे.

पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन सदर आदेशाची अमंलबजावणी करण्यास सुरवात कलेली आहे. **दिनांक १६/०४/२०२० रोजी मनाई आदेशाचे उल्लघंन करणा-या पेट्रोल-डिझेल पंप धारक यांचेवर पालघर जिल्हयात खालील प्रमाणे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

१. फिर्यादी पोशि/२५५८ अशोक निंबा पाटील, नेम.वसई बिट मार्शल यांनी फिर्याद दिली की, दि. १६/०४/२०२० रोजी १७.२५ वा चे सुमारास आरोपीत याने आपल्या ताब्यातील मोटरसायकल विनाकारण बाहेर फिरण्याचे उद्देशाने ओंकार पेट्रोलपंप फोदरवाडी गोखीवरे वसई पुर्व येथे पेट्रोल भरताना दिसुन आला तसेच पेट्रोलपंप मालक व कर्मचारी यांनी कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता मोटरसायकल मध्ये पेट्रोल भरुन मा.जिल्हाधिकारी सो,यांनी कोरोना विषाणुच्या प्रादुर्भाव अनुषंगोन जारी केलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करुन मिळुन आले म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.र.नं. ाा ४४७/२०२० भा.द.वि.सं.कलम १८८, सह आपत्ती व्यवस्थापन अधिनीयम २००५ चे कलम ५१(ब) प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी पो.कॉ.८१०/नितीन राजेंद्र सांगळे वय २८ वर्ष, नेम.विरार पोलीस ठाणे सध्या मांडवी पोलीस दूरक्षेत्र, यांनी फिर्याद दिली की, दि. १६/०४/२०२० रोजी, १८.३० वा.चे.सुमारास मा.जिल्हाधिकारी सो पालघर यांचा कार्यालयीन आदेश क्रमांक /जि.आ.व्य.पालघर/को.वि/पेट्रोल/डिझेल वितरण आदेश/ कावि/४७४/२० दि.०८/०४/२०२० अन्वये पालघर जिल्हयातील सर्व/पेट्रोल/डिझेल पेट्रोलपंप धारक यांना दि.०९/०४/२०२० रोजी ११.०० वा. पासुन पुढील आदेश होईपावेतो अत्यावश्यक व जिवनाश्यक वस्तूंची वाहतूक करणारे वहाने सोडून इतर सर्व प्रकाराच्या वहानांसाठी /पेट्रोल/डिझेल विक्री करण्यास मनाई केली असतांना यामाहा कंपनीची एफ.झेडमोटार सायकल क्रमांक एम.एच.४८/बी.बी.९५९९ व हीरो कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम.एच.४८/बी.पी.२३२६ वरिल चालक यांच्या ताब्यातील वरिल मोटरसायकल यांचे जवळ अत्यावश्यक सेवा पुरवणारे कोणतेही खात्याचे कर्मचारी असल्याचे ओळख पत्र नसतांना कोणत्याही प्रकाराची चौकशी न करता पेट्रोल भरुन दिले म्हणून **विरार पोलीस ठाणे** गु.रजि.नं. ाा ४४६/२०२० भा.द.वि.स.कलम १८८,२६९, सह साथीचे रोग अधिनियम १८९७ मधीलखंड २,३ व ४ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम ५१ (ब) प्रमाणे.गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

**मी गौरव सिंग, पोलीस अधीक्षक, पालघर, पालघर जिल्हयातील सर्व पट्रोल पंप धारक यांना आवाहन करतो की, प्रशासनाने दिलेल्या सुचनाचे तंतोतंत पालन करुन प्रशासनास सहकार्य करावे. अन्यथा आपणास सुध्दा अशा कारवाईस सामोरे जावे लागेल.**